डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ ५२ /२०२६ दि.०५/०३/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

ज्याअर्थी, डोंबिवली वाहतूक उपविभागाचे हद्दीत दिनांक ०६/०३/२०२६ रोजी दुपारी १५:०० वाजेनंतर छत्रपती शिवाजी महाराज सर्कल/घरडा सर्कल, डोंबिवली पुर्व परिसरातुन शिवसेना पक्षाचे वतीने मिरवणुक निघणार आहे. सदरवेळी मिरवणुकी करिता महीला, नागरीक, युवक, युवती मोठया संख्येने उपस्थीत राहुन शिवजयंती उत्सव साजरा करतात. सदर मिरवणुकीत विविध मंडळ, संस्था समाविष्ठ होणार आहेत. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद–	कल्याण रोडवरील छत्रपती शिवाजी महाराज सर्कल डोबिंवली पुर्व येथुन कल्याण रोडने टिळक चौका कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **छत्रपती शिवाजी महाराज सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग–	सदरची सर्व वाहने छत्रपती शिवाजी महाराज सर्कल ते टिळक चौक पर्यंत टिळक चौक ते छत्रपती शिवाजी महाराज सर्कल या मार्गिकेवरून इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद–	मिरवणुक टिळक चौक येथे आलेनंतर टिळक चौक येथुन टिळक रोडने सर्वेश हॉल/ताई पिंगळे चौकाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **टिळक चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग–	सदरची वाहने डॉ. राजेंद्रप्रसाद रोडने चार रस्ता पाटणकर चौक मार्गे मानपाडा रोडने इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद–	मिरवणुक फडके रोडवरील मदन ठाकरे चौक येथे आलेनंतर टिळक रोडने मदन ठाकरे चौका कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **सर्वेश हॉल/ताई पिंगळे चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग–	सदरची वाहने डावे वळण घेवुन भगतसिंग रोडने इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद–	मिरवणुक सर्वेश हॉल येथे आलेनंतर टिळक चौकाकडुन सर्वेश हॉल कडे येणाऱ्या वाहनांना **टिळक चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग–	सदरची सर्व वाहने डावे वळण घेवुन डॉ. राजेंद्रप्रसाद रोडने चार रस्ता/पाटणकर चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद–	मानपाडा रोड चार रस्ता/पाटणकर चौक कडुन स्व. इंदिरा चौकाकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **ग्रीन चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग–	सदरची वाहने डावे वळण घेवुन चिपळुणकर रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद–	स्व. इंदिरा चौकाकडुन ग्रीन चौक मार्गे मानपाडा रोडने चार रस्ता पाटणकर चौकाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **शंकलेशा ज्वेलर्स समोर 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग–	सदरची वाहने पी.पी.चेंबर्स भगतसिंग रोडमार्गे इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद–	छत्रपती शिवाजी महाराज सर्कल डोबिंवली पुर्व येथुन कल्याण रोडने टिळक चौक कडे येणाऱ्या के.डी.एम.टी, एन.एन. एम.टी. खाजगी बसेस व अवजड वाहनांना **छत्रपती शिवाजी महाराज सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग–	सदरची सर्व वाहने छत्रपती शिवाजी महाराज सर्कल येथे यु टर्न घेवुन इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना **दि. ०६/०३/२०२६ रोजी सकाळी १०:०० वा. ते रात्री २३:०० वा. पावेतो** अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(**पंकज शिरसाट**)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण, विशेष शाखा, ठाणे

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण

परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण

नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर

२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

प्रत :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग, पोनि डोंबिवली, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर